**सं.फौ.ख.क्र.११७४/२०२४**

**नि.क्र.१**

**<u>व्हेरीफिकेशन शपथेवर सुरु</u>**

**नाव :– भुषण विश्वासराव निताणकर**

वय :– ३८ वर्षे, धंदा :– नोकरी,

रा. पिंपळे सौदागर, जि.पुणे.

१. माझे लग्न दिपाली सुरेश पाटील हिच्यासोबत दि.२०/०१/२०२० रोजी झाले होते. लग्नानंतर मी, माझी व पत्नी कोरोना काळात हैद्राबाद येथे माझ्या नोकरी निमीत्ताने राहत होतो. त्यावेळी आमच्यामध्ये दिपालीच्या संशयीवृत्तीमुळे बरेच वेळेला वादावादी होत होती व दिपाली ही माझ्यावर संशय घेवून माझ्यावर माझ्या आईसोबत अनैतिक संबंधाबाबत आरोप करत होती. माझ्या पत्नीने अशाप्रकारे माझी बदनामी नातेवाईकांकडे देखील केली तसेच, तिने माझी आतेबहीण शितल सुर्यवंशी हिच्या घरी नाशिक येथे जावून आईसोबत मी गुलछरे उडवतो, आईच्या अंगावर हात फिरवतो अशा शब्दात बदनामी केली. तसेच, माझा चुलत आतेभाऊ तुषार पाटील याच्याकडे ता.नामपुर, जि.नाशिक येथे फोन करुन वरीलप्रमाणे बदनामी केली. तसेच, माझ्या पत्नीने माझा घरचा पत्ता माहिती असतांना देखील माझ्या कार्यालयीन पत्त्यावर सर्व केसेसच्या नोटीसा पाठवून कार्यालयात माझी बदनामी केली. तसेच, मी शिरगांव पोलिस स्टेशन येथे तिच्याविरुध्द तक्रार देण्याचा प्रयत्न केला परंतु, तरी देखील माझी पत्नी माझ्या सर्व नातेवाईकांकडे जावून माझी वरीलप्रमाणे बदनामी करत आहे. त्यामुळे माझी माझ्या पत्नीविरुध्द तक्रार आहे. तसेच, मला नुकसान भरपाई मिळावी व तिच्याविरुध्द कारवाई करुन तिला शिक्षा करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

| **फिर्यादीची सही** |
| --- |
| [signature] |
| **भुषण विश्वासराव निताणकर** |

श्रवणोत्तर स्वीकृती

[signature]

दि:२५/०२/२०२६

**(श्रीमती किर्ती अ. देशपांडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

वडगांव मावळ, जि.पुणे